# शाळांच्या माध्यमातून 'सुलेखन'च्या प्रसारासाठी प्रयत्नशील

## जिल्हाधिकारी अमोल येडगे : शिवाजी विद्यापीठातील राज्यस्तरीय अक्षर संमेलनाचा समारोप

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : 'सध्याच्या डिजिटल युगात सुलेखनाची कला लोप पावत आहे. उद्या पेन हातात असेल का नाही याची शंका व्यक्त होते. अशा स्थितीत अक्षरमित्र हे अक्षरांमधील जादू नेहमी जिवंत ठेवतील. जिल्हा परिषद शाळांच्या माध्यमातून सुलेखन या कलेचा प्रसार करण्यासाठी प्रयत्नशील राहीन. या शाळांमध्ये अशी अक्षर चळवळ राबविण्यासाठी कलाकार, संयोजकांनी सहकार्य करावे', असे आवाहन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी आज येथे केले.

'माझी शाळा माझा फळा' समूह आणि शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजित तिसऱ्या राज्यस्तरीय अक्षर संमेलनाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, संमेलनाचे स्वागताध्यक्ष आणि शासनाच्या गृह विभागाचे सहसचिव व्यंकटेश भट प्रमुख उपस्थित होते. कुलसचिव डॉ. शिंदे यांनी पंढरीच्या वारीप्रमाणे ही अक्षर संमेलनाची वारी होत राहावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमात वृंदा आवडण, मिताली सुर्वे, अलकनंदा परिहार, शीतल गंधक, ज्योत्स्ना पाटील, मनीषा कदम, प्रतीक पानसरे, गणेश तुपे, आदी ३० कलाकारांना राजस्तरीय अक्षर गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मुख्यमंत्री कार्यालयाचे सहसचिव कैलास बिलोणीकर, महसूल व वनविभागाचे सहसचिव संजय इंगळे, आदी उपस्थित होते. संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी स्वागत केले. अमित भोरखडे यांनी प्रास्ताविक केले. दीपक इरकर यांनी सूत्रसंचालन केले. संमेलनाध्यक्ष सतीश उपळावीकर यांनी आभार मानले. संमेलनात आज विद्यापीठ कॅम्पसमध्ये सकाळी आठ वाजता हॅप्पी आर्ट मॉर्निंग रंगले. त्यात वैयक्तिक कलेचे सादरीकरण झाले. त्यानंतर बबन माने, विजय टिपुगडे, अभिजित कांबळे, विजय उपाध्ये यांनी निसर्गचित्र प्रात्यक्षिके सादर केली.



शिवाजी विद्यापीठातील राज्यस्तरीय अक्षर संमेलनाच्या समारोपप्रसंगी रविवारी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी मार्गदर्शन केले. शेजारी कैलास बिलोणीकर, संजय इंगळे, अमित भोरखडे, सतीश उपळावीकर, व्यंकटेश भट, डॉ. व्ही. एन. शिंदे, विनोद ठाकूरदेसाई, आदी उपस्थित होते.

### पुढील संमेलन पुण्यात

■ 'चित्र, अक्षरातून भावना व्यक्त करण्याचे मोठे काम तुम्ही कलाकार करत आहात. तुमच्या कलाविष्कारातून एकाच कल्पनेची अनेक रूपे पाहायला मिळाली. पुढील संमेलन पुणे येथे घेण्याची ग्वाही भट यांनी दिली.



### काड्यापेटीच्या आकारातील 'गुरुचरित्र कथासार'

■ या संमेलनात सुरेश मंदरे यांच्या अनोख्या कलाकृतींचे प्रदर्शन भरविण्यात आले. त्यात काडीपेटीच्या आकारातील गुरुचरित्र कथासार, जगातील सर्वांत लहान हस्तलिखित पुस्तक, एका पानावरील श्रीमद्भगवद्गीता, बायबल, लहान अक्षरामध्ये लिहिलेले राष्ट्रगीत, हनुमान चालिसा, 'राम' या अक्षरात साकारलेला देशाचा नकाशा या कलाकृतींचा समावेश होता.

जनसंपर्क कक्ष

2 7 MAY 2024

पुढारी

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाळांमध्ये 'अक्षर चळवळ'ची गरज

## जिल्हाधिकारी येडगे; राज्यस्तरीय अक्षर संमेलनाची सांगता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मी अक्षरप्रेमी असून लहानपणी कलेसाठी फारसा वेळ देता आला नाही. त्यामुळे जिल्हा परिषद शाळेमध्ये अक्षर चळवळ राबविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले. माझी शाळा मांझा फळा व शिवाजी विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या तिसऱ्या राजस्तरीय अक्षर संमेलनाच्या सांगता सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी गृहविभाग सहसचिव



व्यंकटेश भट होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.

सुलेखनकार, फलक लेखनकार, रांगोळीकार, युवा कलाकार, बालकलाकार आदींचा राजस्तरीय अक्षर गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. रविवारी सकाळच्या सत्रात हॅप्पी आर्ट मॉर्निंग, निसर्गचित्र व प्रात्यक्षिके झाली. यात प्रसिद्ध चित्रकार बबन माने, विजय टिपुगडे, विजय उपाध्ये सहभागी झाले. अभिजित कांबळे यांनी ऑईल पेंटमध्ये साकारलेली कलाकृती वाहवा मिळवून गेली. संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई व अमित भोरखडे यांनी प्रास्ताविक केले. दीपक इरकर यांनी सूत्रसंचालन केले. सतीश उपळावीकर यांनी आभार मानले. यावेळी मुख्यमंत्री कार्यालयाचे सहसचिव कैलास बिलोणीकर, महसूल व वन विभागाचे सहसचिव संजय इंगळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 MAY 2024

पुढारी

# विद्यापीठात आजपासून रोबोटिक्स प्रशिक्षण शिबिर

## रोबोटिक्सच्या तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व प्रात्यक्षिके

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व आरएनटी रोबोटिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने व एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन यांच्या सहकार्याने सोमवार (दि.२७) पासून रोबोटिक्स प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिर १२ वर्षांवरील शालेय विद्यार्थ्यांकरिता असून, सकाळी ११ ते २ या वेळेत होणार आहे.

शिबिरात बेसिक इलेक्ट्रॉनिक्स, रोबोटिक्स, थ्रीडी डिझाईनिंग व प्रिंटिंग आदी विषयांवर आरएनटी रोबोटिक्सच्या तज्ज्ञांकडून मार्गदर्शन व प्रात्यक्षिक दाखविले जाणार आहे.



शिवाजी विद्यापीठातून

विद्यार्थ्यांना भविष्यात करिअरच्या दृष्टीने यांचा वापर कसा करता येईल, याबाबतचेही मार्गदर्शन मिळणार आहे. १ जूनपर्यंत हे प्रशिक्षण शिबिर चालणार आहे. अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन 'नवोन्मेष'चे संचालक प्रा. डॉ. एस.डी. डेळेकर यांनी केले आहे.

2 7 MAY 2024

सकाळ

# बँकिंग प्रशिक्षण क्षेत्रात विद्यापीठ एक पाऊल पुढे : प्र-कुलगुरू

कोल्हापूर : 'बँकिंग प्रशिक्षण क्षेत्रात कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशनच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठ एक पाऊल पुढे टाकत आहे', असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. विद्यापीठात दि. मालेगाव मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँकेच्या आणि असोसिएशनच्या सदस्य बँकांच्या सेवकांसाठी आयोजित 'बँकिंग ३६० डिग्री' या प्रशिक्षण कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत केले. नागरी बँक्स असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल नागराळे यांनी प्रास्ताविक केले. दहा दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम विद्यापीठात होणार असून त्यात बारा तज्ज्ञ प्रशिक्षक मार्गदर्शन करणार आहेत.